राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० आर्थिक वर्षात National Free Diagnosis Services- Free Pathological Services लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध अनुदानातून MDR व XDR क्षयरुग्णांकरीता अत्यावश्यक असणाऱ्या क्षयरोगविरोधी औषधांची खरेदी दर करारानूसार करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०७१९/प्र.क्र.४५०/आरोग्य -७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/खरेदीकक्ष/सन २०१९-२०/राआअ अनुदान/क्षयविरोधी औषधे-खरेदी/गुजरात दर करार/प्र.मा./१९८४-८८/ २०१९, दिनांक २९ जुलै, २०१९.

२) श्री.मनोज झालानी, अतिरिक्त सचिव व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, नवी दिल्ली पत्र दि. २३ मे, २०१९ व केंद्रीय क्षयरोग विभाग, नवी दिल्ली यांच्याकडील दिनांक ०१ जानेवारी, २०१९, ०४ फेब्रुवारी, २०१९ व २७ फेब्रुवारी, २०१९ रोजीचे पत्रे.

३) डॉ.व्ही.एस.सल्होत्रा, ADDG (TB), नवी दिल्ली, दिनांक १० जून, २०१९ रोजीचे पत्र.

४) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील दिनांक २६ जुलै, २०१९ रोजीची मान्य टिप्पणी.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षात केंद्र शासनाने मंजुर केलेल्या वार्षिक कृती आराखडयामध्ये FMR Code ६.४.१ अन्वये National Free Diagnosis Services- Free Pathalogical Services या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानातून MDR व XDR क्षयरुग्णांकरीता अत्यावश्यक असणाऱ्या क्षयरोगविरोधी औषधांची खरेदी दरकरारानूसार करण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत MDR व XDR क्षयरुग्णांना आवश्यक असणाऱ्या काही अत्यावश्यक औषधांचा पुरवठा Central TB Division, New Delhi यांच्याकडून

नजीकच्या काळात होईपर्यंत सदरची औषधे स्थानिक पातळीवर खरेदी करण्याबाबत केंद्र शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियान (पीआयपी अंतर्गत) सन २०१९-२० मधील उपलब्ध असलेल्या अनुदानातून खरेदी करण्यास केंद्र शासनाकडून संदर्भित दिनांक २३ मे, २०१९ च्या पत्रान्वये परवानगी देण्यात आलेली आहे. सदरची औषधे MDR व XDR क्षयरुग्णांना अत्यावश्यक असून सदरची औषधे न मिळाल्यास रुग्णांचा योग्य उपचार न झाल्यामुळे आजार बळावण्याची दाट शक्यता असते. सदर बाब विचारात घेता सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील केंद्र शासनाने मंजुर केलेल्या वार्षिक कृती आराखडयामध्ये FMR Code ६.४.१ या लेखाशिर्षांतर्गत National Free Diagnosis Services- Free Pathological Services अंतर्गत उपलब्ध निधीतून MDR व XDR क्षयरुग्णांना अत्यावश्यक असणाऱ्या अंदाजित रक्कम रु.१२१६.६५ लक्ष रकमेची क्षयरोगविरोधी औषधांची खरेदी Gujrat Medical Services Corporation Ltd. (GMSCL) यांचे दर करारावर करण्याकरीता प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), मुंबई यांनी सादर केलेला आहे.

त्यानूसार खालील विवरणपत्रातील MDR व XDR क्षयरुग्णांकरीता एकूण वार्षिक आवश्यकतेच्या २५ टक्के याप्रमाणे आवश्यक असलेल्या औषधांची खरेदी Gujarat Medical Services Corporation Ltd. (GMSCL) यांचे दर करारावर हाफकिन बायोफार्मा सिटीकल्स लि., मुंबई येथील खरेदी कक्षाकडून करण्याकरीता पुढील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

विवरणपत्र

Sr. No	Name of Medicine	Total Rate with GST as per GMSCL RC (In Rs.) as per pack size	Quantity	Total Amount (In Rs.)
1	Cap. Cycloserine 250mg	**23.325**	**3923000**	**91503975.00**
2	Inj. Capreomycin 1gm Vial	**201.60**	**87000**	**17539200.00**
3	Cap. Rifabutin 150mg	**32.247**	**84000**	**2708748.00**
4	Tab. Amoxycillin + Clavulanic Acid 1gm	**7.56**	**481000**	**3636360.00**
5	Tab. Pyridoxine 50mg	**0.5867**	**3210000**	**1883307.00**
		0.5867	**7490000**	**4394383.00**
	Total			**121665973.00**

अटी :-

१) MDR व XDR क्षयरुग्णांची संख्या निश्चित करुन रुग्ण संख्या व लागणारी औषधे (डोसेससह) यांची संख्या आणि पुरवठादाराला औषधे देण्यासाठी लागणारा कालावधी याची काटेकोरपणे सांगड घालून औषधे खरेदी करावीत.

२) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली (Central TB Division) यांच्या दि.०१/०१/२०१९, ०४/०२/२०१९, २७/०२/२०१९, दि.२३/०५/२०१९ व दि.१०/०६/२०१९ पत्रान्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार कार्यवाही करण्यात यावी. MDR व XDR क्षयरुग्णांकरीताच्या औषधांची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात येऊन त्यानूसार खरेदी करण्यात यावी.

३) सदरहू औषधांचे विनिर्देश केंद्र शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) केंद्र शासनाने मान्य केलेल्या मार्गदर्शक सूचनेनूसार संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी तयार केलेले असावेत. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी.

४) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित मर्यादेत खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) वरील विवरणपत्रामध्ये नमूद औषधांची प्रस्तावित खरेदीसाठी येणारा खर्च हा सन २०१९-२० मधील PIP मध्ये मंजूर झालेल्या FMR Code 6.4.1 अंतर्गत National Free Diagnosis Services- Free Pathalogical Services या लेखाशिर्षाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतची संपूर्ण जबाबदारी कार्यक्रम प्रमुखांची राहील.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.खरेदी-२०१६/प्र.क.२४०/आरोग्य-८, दिनांक २६ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१२) अतिरिक्त सचिव व अभियान संचालक (रा.स्वा.मि.), भारत सरकार, स्वास्थ कल्याण परिवार मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अशाप-T-१८०१८/०४/२०१८-Part(२) Dated २३ May, २०१९ अन्वये कळविल्यानुसार प्रस्तावित खरेदी ही वार्षिक मागणीच्या २५% पेक्षा जास्त होणार नाही याची कार्यक्रम प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

वरील १ ते १२ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व औषधांची खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे करण्यात आली आहे किंवा नाही हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201908131513233317 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2019.09.13 12:26:46 +05'30'

(वर्षा मुं. भरोसे)

अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
४) महालेखापाल (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
५) संबंधित कोषागार अधिकारी
६) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
७) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
८) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
९) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
१०) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
११) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
१२) निवडनस्ती (आरोग्य-७)